


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ४६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.२९ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## पुण्यात पाण्याचे संकट गडद; येत्या पाच वर्षांत लोकसंख्या एक कोटी पार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, पुणे :** पुणेकरांसमोर पाण्याचे संकट गडद होऊ लागले असून, २०३२-३३ पर्यंत शहराची लोकसंख्या एक कोटी पार जाण्याचा अंदाज आहे. पाण्याची वाढती गरज पाहता, येत्या काळात शहराची तहान भागविण्यासाठी २३.२० अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी लागणार आहे. ही संभाव्य गरज लक्षात घेऊन महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी राज्याच्या मुख्य सचिवांकडे अतिरिक्त पाणी कोट्याची मागणी केली असून, त्यासाठी जलसंपदा विभागाच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

येत्या २०५५-५६ पर्यंत पुण्याची लोकसंख्या ही दोन कोटींच्या घरात पोहोचण्याचा अंदाज असून, तब्बल ४६.०६ 'टीएमसी' पाण्याची गरज भासणार आहे. उपलब्ध पाणीसाठ्यापेक्षा अधिकचे पाणी केवळ पुणे शहराला लागणार असल्याने पुणेकरांसह समस्त जिल्हावासियांपुढे पिण्याचा पाण्याचा संघर्ष तीव्र होणार आहे.

> पुणे शहराची भविष्यातील गरज ओळखून पाण्याचे नियोजन करण्यात येत आहे. पाण्याची बचत करण्यासह नवनवीन स्त्रोत शोधण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी सरकारदरबारी प्रयत्न करण्यात येत आहेत.
> **– नवलकिशोर राम, महापालिका आयुक्त**

महापालिकेच्या अंदाजानुसार, सध्या पुण्याची लोकसंख्या ८१.६४ लाख असून, शहरासाठी वर्षाला सुमारे २१.४० 'टीएमसी' पाण्याची गरज आहे. मात्र, २०२५-२६ साठी जलसंपदा विभागाकडून महापालिकेला १४.६१ 'टीएमसी' पाणी कोटा मंजूर करण्यात आला आहे.

लोकसंख्या वाढीचा वेग कायम राहिल्यास २०५५-५६ पर्यंत पुण्याची लोकसंख्या ही दोन कोटींच्या घरात पोहोचण्याचा अंदाज महापालिकेने व्यक्त केला आहे. त्या वेळी शहराला तब्बल ४६.०६ 'टीएमसी' पाण्याची गरज भासणार आहे. त्यामुळे भविष्यातील पाणीपुरवठ्याचे नियोजन आतापासूनच करण्याची गरज आहे. मुळशीतून सात 'टीएमसी' पाण्याची मागणी शहरात नव्याने समाविष्ट झालेल्या गावांचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी मुळशी धरणातून सात 'टीएमसी' पाणी कोटा मिळावा, अशी महापालिकेची मागणी आहे. याबाबतचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे असून, त्यावर निर्णय अपेक्षित आहे.



उंड्री, पिसोळी, मांजरी, फुरसुंगी आणि परिसरातील पाण्याची गरज भागविण्यासाठी खडकवासला धरणातून चार 'टीएमसी' पाणी उचलण्याचा प्रस्ताव आहे. त्यासाठी सुमारे १२ किलोमीटर लांबीची भूमिगत जलवाहिनी आणि दोन ठिकाणी पाणी उचलण्याची व्यवस्था प्रस्तावित करण्यात आली आहे. या प्रस्तावालाही जलसंपदा विभागाच्या सहकार्याची आवश्यकता आहे.

येत्या २०३२-३३ मध्ये २३.२० 'टीएमसी'ची गरज असताना २०५५-५६ मध्ये ती ४६.०६ 'टीएमसी'वर पोहोचण्याचा महापालिकेचा अंदाज आहे. मुळशीतून सात 'टीएमसी' आणि खडकवासला धरण साखळीतून अतिरिक्त चार 'टीएमसी' पाणी मिळविण्याचे प्रस्ताव असले, तरी भविष्यातील ी गरज भागविण्यासाठी ४६.०६ 'टीएमसी' पाणी कुठून आणि कसे उपलब्ध करणार, हा मोठा प्रश्न महापालिकेसमोर आहे.

**१,२१० कोटींच्या थकबाकीचा प्रश्न**

प्रक्रिया न केलेल्या पाण्याच्या बिलांबाबतचा सुमारे एक हजार २१० कोटी रुपयांहून अधिक थकबाकीचा प्रश्न महापालिका आणि जलसंपदा विभागादरम्यान प्रलंबित आहे. २०१६ पासूनच्या थकबाकीसह पाणी दरवाढीचा मुद्दा महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरण समोर प्रलंबित आहे. अतिरिक्त पाणी कोटा, मुळशीतील पाणीवाटप आणि खडकवासला-फुरसुंगी जलवाहिनीच्या प्रस्तावावर जलसंपदा विभागाकडून सकारात्मक सहकार्य मिळण्याची अपेक्षा महापालिका प्रशासनाने व्यक्त केली आहे.

## स्टोन क्रेशर मशीनमध्ये अडकून १७ वर्षाच्या युवकाचा मृत्यु

### लोणीकंद पोलीस स्टेशनमध्ये ३ जणांवर गुन्हा दाखल



**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.२८, लोणीकंद (पुणे) :** स्टोन क्रेशरवर अल्पवयीन मुलाला कामाला ठेवून त्याला कोणतेही सुरक्षा साधने न पुरविल्याने स्टोन क्रेशर मशीनमध्ये अडकून १७ वर्षाच्या मुलाचा मृत्यु झाला. लोणीकंद पोलिसांनी स्टोन क्रेशर ठेकेदारांवर गुन्हा दाखल केला आहे.

प्रिन्स विजयसिंग धुर्वे (वय १७) असे मृत्यु पावलेल्या युवकाचे नाव आहे. दिलीप संभाजी शिळीमकर (वय ४०, रा. साई श्रेया समृद्धी अपार्टमेंट, बावडी रोड, वाघोली), सत्यजित अशोक जना (वय ३५, रा. स्पंदन स्पर्श, बावडी रोड, वाघोली), अमित भगवान अकोलकर (रा. व्हीजन प्रिसा अपार्टमेंट, रावेत, निगडी) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. याबाबत हवालदार अजित हरीभाऊ कुन्हे यांनी लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना लोणीकंद येथील साई राम स्टोन क्रेशर मशीन येथे १२ सप्टेंबर रोजी घडली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी साई राम स्टोन क्रेशर मशीन ठेकेदारीवर चालविण्यास घेतले आहे. प्रिन्स विजयसिंग धुर्वे हा १७ वर्षाच्या आहे, हे माहिती असताना त्याला स्टोन क्रेशर मशीनवर कामावर ठेवले आहे. बालकांना धोकादायक व्यवसाय करण्यास प्रतिबंध असताना त्याला कामावर ठेवले. त्याला कोणत्याही प्रकारची सुरक्षा साधने, जसे सुरक्षा हेल्मेट, सेफ्टी बेल्ट, सेफ्टीनेट इत्यादी साधने उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे प्रिन्स धुर्वे स्टोन क्रेशर मशीनमध्ये अडकून त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी सुरुवातीला अकस्मात मृत्यु अशी नोंद केली होती. त्याची चौकशी केल्यानंतर रविवारी गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक विलास मोटे तपास करीत आहेत.

## ई-पीक पाहणीत मॅपचा घोळ; शेत एकीकडे लोकेशन दुसरीकडे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, पारनेर (अहिल्यानगर) :** खरीप हंगामातील पिकांची ई-पीक पाहणी व नोंदणी करताना मोबाईल ॲपमधील लोकेशन आणि मॅपच्या तांत्रिक अडचणींमुळे टाकळी ढोकेश्वर परिसरातील शेतकऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. प्रत्यक्ष शेत आणि ई-पीक नोंदणीच्या ॲपवर दाखविण्यात येणारे लोकेशन यामध्ये तफावत दिसून येते. त्यामुळे अनेकांची पीक नोंदणी रखडली आहे.

ई-पीक पाहणीच्या माध्यमातून शेतकर्यांनी आपल्या शेतातील सोयाबीन, बाजरी, तूर यासह विविध पिकांची नोंद करणे अपेक्षित आहे. मात्र, नोंदणी करताना शेतकरी प्रत्यक्ष शेतात उभा राहून लोकेशन घेण्याचा प्रयत्न करीत असताना ॲपमध्ये वेगळेच ठिकाण किंवा चुकीचा मॅप दाखविला जात असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे प्रत्यक्ष शेत एका ठिकाणी असताना पीक नोंदणीसाठी आवश्यक असलेले लोकेशन दुसऱ्याच ठिकाणी दोन ते तीन किलोमीटर अंतरावर दाखविले जात आहे.

या तांत्रिक अडचणीमुळे अनेकवेळा शेतकऱ्यांना पुन्हा पुन्हा शेतात जावे लागत असून, नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वेळ आणि श्रम खर्ची पडत आहेत. विशेषतः शेतकऱ्यांना मोबाईल नेटवर्कची समस्या असल्यास अडचणीत आणखी भर पडत आहे. पीक नोंदणी शेतकर्यांसाठी महत्त्वाची प्रक्रिया असल्याने ॲपमधील मॅप व लोकेशनची अचूकता तातडीने तपासणे आवश्यक आहे. चुकीच्या लोकेशनमुळे एखाद्या शेतकऱ्याची पीक नोंदणी अपूर्ण राहिल्यास भविष्यात त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ, पीकविषयक मदत किंवा इतर प्रशासकीय प्रक्रियेत अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

## पुष्पगुच्छाऐवजी दुष्काळग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीस मदत करा, सुनेत्रा पवारांचं आवाहन



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, बारामती :** महाराष्ट्रात यंदा अपेक्षित पाऊस पडलेला नाही. जुलै महिन्याच्या सुरुवातीला राज्यात सर्वदूर मुसळधार पाऊस पडला. त्यामुळे यंदा एल निनोचे संकट असताना चांगला पाऊस पडत असल्याचं चित्र दिसत होतं. पण त्यानंतर जो पाऊस थांबला परत राज्यात आलाच नाही. अर्थात ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये काही प्रमाणात पाऊस पडला. पण शेतीला पूरक असा पाऊस झालाच नाही. यामुळे अनेक शेतकऱ्यांची पिकं करपली आहेत. शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. शेतकऱ्यांवर ओढावलेलं संकट पाहून राज्य सरकारकडून २६५ तालुक्यांमध्ये कोरडा दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी महत्त्वाचं आवाहन केलं आहे.

राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर सत्कारासाठी पुष्पगुच्छ देण्याऐवजी मुख्यमंत्री सहायता निधीस मदत करण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले. बारामती सहकारी बँकेच्या ६५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत त्या सोमवारी बोलत होत्या. राजमाता जिजाऊ सांस्कृतिक भवन येथे झालेल्या या सभेला सुनेत्रा पवार प्रमुख उपस्थित होत्या. अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांची बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील ही पहिलीच उपस्थिती होती. अजितदादांच्या निधनाला आठ महिने पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सुनेत्रा पवार यांनी सोमवारी सकाळी बारामतीतील विद्या प्रतिष्ठान परिसरातील त्यांच्या स्मृतिस्थळी जाऊन अभिवादन केले. त्यानंतर झालेल्या बँकेच्या सभेत अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देताना त्या भावुक झाल्या.

**सुनेत्रा पवार यांना अश्रू अनावर !**

अनेक वर्षांपासून सगळे म्हणायचे, वहिनी तुम्ही अजितदादांसोबत वार्षिक सर्वसाधारण सभेला हजर राहायला हवे. मात्र, अशा सभेला मला एकट्याने यावे लागेल, असे कधी वाटले नव्हते. अजितदादांची सर कधीच कोणाला येणार नाही, असे सांगताना सुनेत्रा पवार यांना अश्रू अनावर झाले.

बारामती आणि दादांचे नाते एवढे घट्ट होते की, दादांशिवाय कोणतीही गोष्ट अपूर्ण वाटते, असेही त्यांनी नमूद केले. गेल्या पाच वर्षांत अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती सहकारी बँकेने उल्लेखनीय काम केले असून बँकेने ३८.८५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळवला आहे, असे सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

## विंचूरच्या श्रीराम चौक, तीनपाटी परिसरातील अतिक्रमणावर धडक कारवाई



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२८, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील अत्यंत गजबजलेल्या त्रिफुली परिसरातील श्रीराम चौकात प्रशासनाने आज, २८ सप्टेंबर रोजी धडक मोहीम राबवून रस्ते आणि फुटपाथ अतिक्रमणमुक्त केले. कडक आणि शिस्तबद्ध पोलीस बंदोबस्तात पार पडलेल्या या कारवाईमुळे विंचूर-निफाड आणि विंचूर-येवला मार्गावरील रस्ते प्रशस्त झाले असून वाहतूक कोंडीतून नागरिकांची मोठी सुटका झाली आहे. विशेष म्हणजे, प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत अनेक स्थानिक दुकानदारांनी स्वतःहून पुढाकार घेत रस्त्यावरील साहित्य हटवून प्रशासनाला उत्तम सहकार्य दाखवले. गेल्या काही काळापासून श्रीराम चौकात रस्त्याच्या दुतर्फा झालेल्या अतिक्रमणामुळे वाहतुकीची मोठी कोंडी होत होती, तसेच पादचाऱ्यांना चालणेही कठीण झाले होते. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी प्रशासनाने सुनियोजित तयारी करत ही मोहीम हाती घेतली. निफाडचे पोलीस उपविभागीय अधिकारी पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कोते आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या थेट उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली ही कारवाई शांततेत व अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली.

कारवाईनंतर फुटपाथ पूर्णपणे मोकळे झाल्याने पादचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून दोन्ही मुख्य मार्गांवरील वाहतूक आता अधिक गतिमान आणि सुरक्षित झाली आहे.

**गरजू व्यावसायिकांना पर्यायी जागेची मागणी**

या मोहिमेचे सर्व स्तरांतून स्वागत होत असतानाच, ज्या गरजू व छोट्या दुकानदारांचे व्यवसाय या कारवाईत प्रभावित झाले आहेत, त्यांच्या रोजगाराचा विचार प्रशासनाने संवेदनशीलतेने करावा, असा सूर उमटत आहे. या हातावर पोट असणाऱ्या गरजू व्यावसायिकांना प्रशासनाने योग्य ठिकाणी पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी आग्रही मागणी विंचूरमधील सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थांनी केली आहे.

## गणपती विसर्जनातील दुर्घटनाग्रस्त कुटुंबांचे आमदार रत्नाकर गुट्टे यांच्याकडून सांत्वन

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२८, पालम (परभणी) :** गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील पालम शहरातील गणेशभक्त मुंजाजी आश्रोबा घोरपडे आणि गजानन रामदास घोरपडे या दोन युवकांचा गणपती विसर्जनादरम्यान धानोरा काळे येथील नदीपात्रात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. तसेच शेखराजूर येथे गणपती विसर्जनासाठी जात असताना विजेच्या धक्याने नागनाथ पवार यांचा मृत्यू झाला.या तिन्ही घटनांनी पालम तालुक्यावर शोककळा पसरली आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार रत्नाकर गुट्टे यांच्या वतीने तिन्ही मृतांच्या कुटुंबीयांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन सांत्वन करण्यात आले. यावेळी कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांच्या दुःखात सहभागी होत, या कठीण प्रसंगी धीर देऊन



**प्रत्येक कुटुंबाला ५० हजारांची मदत**

या तिन्ही कुटुंबांना आमदार रत्नाकर गुट्टे यांच्या वतीने प्रत्येक कुटुंबाला प्रत्येकी ५० हजार रुपये आर्थिक मदत देण्यात आली. संकटाच्या काळात कुटुंबीयांच्या पाठीशी उभे राहून त्यांना आधार देण्याच्या भावनेतून ही मदत करण्यात आली. आपल्या जवळच्या व्यक्तीला गमावण्याची वेदना कोणत्याही आर्थिक मदतीने किंवा शब्दांनी कमी होऊ शकत नाही. मात्र दुःखाच्या प्रसंगी कुटुंबीयांच्या पाठीशी उभे राहणे आणि 'आपण एकटे नाही' हा विश्वास देणे, हा या मदतीमागील उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

गणपती विसर्जनाच्या काळात घडलेल्या या तीन दुर्दैवी घटनांमुळे संबंधित कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, या कुटुंबांच्या दुःखात सहभागी होत त्यांना शक्य ती मदत व आधार देण्याची भूमिका आमदार रत्नाकर गुट्टे यांनी व्यक्त केली. या सांत्वन भेटीदरम्यान आमदार गुटे काका मित्र मंडळाचे प्रभारी माधवराव गायकवाड, वसंतराव शिरसकर, झियाउल्ला खा पठाण, जालिंदर हत्तीआंबिरे, गणेशराव घोरपडे, उबेदखा पठाण, विजय घोरपडे, माऊली घोरपडे, शेख गौस यांची उपस्थिती होती.

अक्षराज






## वेगवान कासव आणि सैरभैर ससे

पिढ्यान् पिढ्या सांगत येत असलेली कासव आणि ससा यांच्या शर्यतची गोष्ट वेगवान जगात कुणाच्या फारशी पचनी पडत नाही. व्यवस्थापन कौशल्यातील नवे गुरू आणि त्यांचे शिष्य कान वाकडे करूनच ती ऐकतात. सगळ्यांना सशांसारखं भरभर धावायचं आहे. सत्तेचं, श्रीमंतीचं, पदांचं, संपन्नतेचं लुसलुशीत गवत खायचं आहे आणि झोपून जायचं आहे. कासवासारखा संयम आता कुणी दाखवावा! सत्ताकारण आणि राजकारणात तर ते दुर्मीळच. जे हवं ते दोन मिनिटांत तयार मिळावं, हा मॅगी-नूडल्सचा ट्रेंड तिथे रुजू बघतो आहे. प्रसिद्धीचा हव्यास, रील्सचे कल्चर, मायावी फॉलोअर्सचा पाठिंबा देणाऱ्या अंगठ्यांचं बळ मोठं होऊ बघत आहे. ते प्राप्त करण्यासाठीची धडपड सुरू आहे. त्यासाठी बेताल वक्तव्यांचा आधार, चुकीच्या कृतींचं समर्थन सर्रास केलं जात आहे. व्यक्तिगत महत्त्वाकांक्षांचे धुमारे वेगळ्याच उंचीकडे झेपावत असल्याने त्यात पक्ष, त्यांची ध्येये, शिस्त यांची चिंता अभावानंच दिसते. नवोदितांमध्ये तर ती आहेच, पण जुनीजाणती मंडळीही हळूहळू त्याच दिशेने सरकत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कासवाची प्रेरणा सांगणं अनेकांना आश्चर्यात टाकणारं. त्याचा अन्वयार्थ कुणाला आत्ममंथनाकडे वळायला लावणारा, कुणाला धडा शिकविणारा, तर कुणाला इशारा देणाराही आहे.

उद्योजकांशी बोलताना मुख्यमंत्री बोलले त्याचा मथितार्थ असा होता की, 'बोलणारे काही तरी बोलून जातात, काही वेळा हेडलाइन घेतात; मात्र काम करणाऱ्यांची कामं पिढ्यान् पिढ्या लक्षात राहतात. मला जेव्हा एखादं काम करायचं असतं. त्याची योग्यता पटते तेव्हा माझ्यावर कुणी कितीही टीका करू दे, माझा निर्णय झाला की मी त्या दिशेनं हळूहळू पुढे जातो. याबाबतीत माझी प्रेरणा कासव आहे. कासवाला कुणी दगड मारला की तो जसा शेलमध्ये जातो, दगड पाठीवर पडत राहतात. त्याला काहीच लागत नाही. आपल्यावर जेव्हा टोकाची टीका होते, तेव्हा कासवासारखं शेलमध्ये जायचं. टीका संपली की काम करायचं. हळूहळू चालत जायचे, कधी न कधी मंझील मिळतेच.'

त्यांचं ऐकलं तर अनेक प्रश्न सुटतील. नागपुरात डीजेवर बंदीचा निर्णय पोलिसांनी घेतला. त्याच्या विरोधात विरोधीपक्षाचा कुठलाही नगरसेवक अथवा नेता पुढे आला नाही. विरोधक भाजपचेच नेते होते. भाजपचे माजी आमदार संदीप जोशी बंदीच्या बाजूने होते. 'हिंदूंच्याच सणांना बंदी का' असा सवाल करीत आमदार प्रवीण दटके विरोध करीत होते. निर्धारित मर्यादेत डीजे वाजवा असा मध्यममार्ग शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी काढला. हे परस्पर विरोधी आवाज त्यांच्या समर्थकांनी इतके मोठे केले की, त्यावरून पक्षाच्या कोअर कमिटीतही त्यावरून तणाव झाला. कुणी त्यावरून बाजूला हटायला तयार नव्हते. काही काळासाठी का होईना कुणालाही कासव होऊन टीका संपेपर्यंत शेलमध्ये जाण्याची इच्छा झाली नाही.

बुलढाण्याचे शिवसेना आमदार संजय गायकवाड आणि चिखलीच्या भाजप आमदार श्वेता महाले यांच्यातील शीतयुद्ध आता समोरासमोरच्या लढाईत परावर्तित झाले आहे. बुलढाण्याच्या आमदारांनी आपल्या मुलाचा वाढदिवस चिखलीत साजरा केला. त्याच्यापेक्षा मोठा सोहळा चिखलीच्या आमदारांनी आपल्या यजमानांच्या वाढदिवसानिमित्त बुलढाण्यात आयोजिला. 'बाप तो बाप होता है' असे इशारे दिले गेले. त्यावरूनही वादळ उठलं. अमरावतीत भाजपचे खासदार अनिल बोंडे आणि माजी खासदार नवनीत राणा यांच्यातही असाच वाद उफाळला आहे. नागपूर महापालिकेतील विविध समित्यांच्या काही सभापतींचे काम 'दृष्ट' लागावी असं सुरू आहे. कुणाचे कुणावर नियंत्रण नाही. सत्तापक्ष नेता नावाची नियंत्रण व्यवस्था असते, महापौरांचे निर्देश ऐकायचे असतात हे त्यांच्या गावीही दिसत नाही. प्रत्येकाला पुढे जायची घाई, ही घाई कासवाची गोष्ट कशी समजून घेणार? काँग्रेसचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय वसंत साठे यांच्या जन्मशताब्दी निमित्त काढलेल्या वसंतस्मृती विशेषांकाच्या प्रकाशनप्रसंगी नितीन गडकरींनी काढलेले चिमटे झोंबणारे आहेत. ते म्हणतात, 'जो येतो तो सत्ताधारी पक्षात घुसतो. तो का आला ते कळत नाही आणि का गेला तेही कळत नाही. कार्यकर्ते आता विचाराचे किंवा पक्षाचे नव्हे तर सत्ताधारी पक्षांचे अनुयायी होत आहेत. भाजपमध्ये गर्दी झाली तरीही लोक येतच आहेत. जुने विचारतात आम्ही कुठे जायचं? आम्ही सांगतो, बाहेर जा.' हा त्यांचा टोला मिश्कील, तरी अंतर्मुख करणारा आहे. वेगवान सश्यांचे कान टोचणारा आहे.

**– अतुल पांडे**

# शिव्यांचा मुक्त वापर : ढासळत्या नीतिमत्तेचे प्रतीक

आजमितीला प्रवासात, बाजारात किंवा गर्दीच्या ठिकाणी एकमेकांशी सहज बोलतानाही तरुण मंडळींकडून घाणेरड्या शिव्यांचा आणि अश्लील शब्दांचा सर्रासपणे वापर केला जातो. शिव्या किंवा अपशब्दांचा वापर केल्याशिवाय बऱ्याचदा यांचे वाक्यच पूर्ण होत नाही. तरुण मित्र मंडळींमध्ये एकमेकांना हाक मारतानासुद्धा सम ोरच्याच्या नावापेक्षा बऱ्याचदा एखाद्या शिवीनेच त्याचा उद्धार केला जातो. शेजारी पाजारी म हिला किंवा लहान मुले आहेत, याचा तिळमात्र विचार केला जात नाही. त्यामुळे एकमेकांना शिव्या देण्यासाठी भांडणेच व्हायला हवीत असे काही गरजेचे नाही. नेहमीच्या संभाषणात सुद्धा शिव्यांच्या माळा गुंफल्या जातात. कालपरत्वे मुलामुलींमधील दरी कमी झाल्याने तरुणवर्गाच्या गटामध्ये मुली सुद्धा सामावलेल्या असतात.

त्या सोबत असल्या, तरी मुलांच्या संभाषणात शिव्या काही टाळल्या जात नाहीत. आजमितीला बहुतेक सर्वच ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर प्रौढांसाठी 'विशेष' वेब सिरीज तयार केल्या जातात. या वेब सिरीजमध्ये पदोपदी शिव्यांचा मारा केलेला असतो. यांतील स्त्री पात्रांसमोरही शिव्या आणि अश्लील शब्दांचा वापर केलेला असतो. काहीवेळा यांतील स्त्री पात्रांच्या तोंडीही शिव्या दिल्या जातात. दुर्दैवाने यातून मराठी वेब सिरीजही सुटलेल्या नाहीत. आजमितीला सिनेम ागृहातील चित्रपटांपेक्षा वेब सिरीज निर्मितीचे प्रमाण वाढल्याने नामवंत कलाकारही वेब सिरीजमध्ये काम करू लागले आहेत. आयुष्यभर



ज्यांनी सुसंस्कृत आणि सभ्य कलाकार म्हणून नावलौकिक कमावला असे कलाकारसुद्धा या वेब सिरीजमधून बेधडक शिव्या हासडताना दिसू लागले आहेत. या प्रौढांसाठीच्या वेब सिरीज पाहण्यासाठी वयाचे कुठ्लेही प्रमाणपत्र द्यावे लागत नाही. केवळ एका बटनावर क्लिक केल्यावर लहान मुलेसुद्धा या सिरीज सहज पाहू शकतात. त्यामुळे मुलांना विरंगुळा म्हणून आईबाबांनी दिलेल्या स्मार्ट फोनवर आपली मुले असल्या रील्स आणि वेब सिरीज पाहत नाहीत ना, याकडेही पालकांनी लक्ष द्यायला हवे. काही घरांमध्ये या वेब सिरीज घरातील स्मार्ट टीव्हीवर पाहिल्या जात असल्याने त्यांतील कलाकारांनी दिलेल्या शिव्या हळूहळू घरातील लहान म ुलांच्याही तोंडी येऊ लागल्या आहेत.

दहा-बारा वर्षांची कोवळी मुलेही आता एकमेकांशी बोलताना शिव्यांचा वापर करत असल्याचे चित्र काही ठिकाणी दिसून येते. ज्या शिव्यांचा अर्थही माहित नाही अशा शिव्या या मुलांच्या तोंडून ऐकल्यावर भविष्यात आणखी काय ऐकावे लागणार आहे, याची कल्पनाही करवत नाही. असल्या रील्स काय किंवा ओटीटी प्लॅटफॉर्म्सवरील वेब सिरीज काय यांना सेन्सॉरचे बंधन नसल्याने इथे शिव्या आणि अश्लील शब्दांचा बाजार बिदिक्कातपणे भरलेला असतो. या रील्स आणि वेब सिरीजमधील शिव्या आणि अश्लील शब्दांच्या सुमार वापरामुळे आजच्या तरुण पिढीला चारचौघांत शिव्या देण्यात काहीही गैर वाटत नाही.

माणसातील संस्कार त्याच्या वागण्या बोलण्यातून कळतात. मुलांच्या किंवा तरुणांच्या बोलण्यात अश्लील शब्दांचा आणि शिव्यांचा वापर असेल, तर दोष त्याला नाही, तर त्याच्या आईवडिलांना दिला जातो. त्यामुळे शिव्यांचा सतत वापर करणाऱ्यांनी ही बाबही लक्षात घ्यायला हवी. पूर्वी एकत्र कुटुंबामुळे घरातील आजी-आजोबांकडून नातवांवर आपल्या संस्कृतीचे, अध्यात्माचे संस्कार केले जात असत. ग्रामीण भागातून शहरात नोकरी व्यवसायासाठी आलेल्या पिढीतही घरातील स्त्री घर सांभाळण्यासोबत आपल्या मुलांवर चांगले संस्कार करण्याचा कसोशीने प्रयत्न करत असे. आज काळ बदलला आहे. घरातील स्त्री आणि पुरुष दोघेही नोकरी करू लागले आहेत, त्यामुळे आजची बहुतांश मुले बेबी सिटिंगमध्ये मोठी होऊ लागली आहेत. वेळेच्या अभावामुळे आईवडिलांसोबत मुलांचा संवादच उणावू लागला आहे, त्यामुळे संस्कार काय ते केवळ संडे टू संडे मिळू लागले आहेत.

त्यातही वाढत्या स्पर्धेत आपल्या पाल्याचा निभाव लागावा यासाठी पालक आपल्या मुलांना कॉन्व्हेन्ट शाळांमध्ये घालू लागल्याने मुलांवर भारतीय संस्कृतीचे संस्कार होणे दुरापास्तच झाले आहे. समाजातील वाढती गुन्हेगारी लक्षात घेऊन शिक्षण विभागाने शाळांतून नीती आणि नैतिक मूल्याचे शिक्षण अनिवार्य केले आहे; मात्र अनेक शाळांमध्ये या विषयासाठी शिक्षकच देण्यात आलेले नाहीत त्यामुळे या विषयाच्या तासिकेम ध्ये वेगळेच काहीतरी शिकवले जाते. समाजाची ढासळती नीतिमत्ता लक्षात घेता भावी पिढीमध्ये संस्कारांचे बीज रोवणे आणि ते वाढवणे आज अनिवार्य झाले आहे. यासाठी अन्य गोष्टींना दोष देण्याऐवजी पालकांनीच आपल्या पाल्याचे संपूर्ण दायित्व घ्यायला हवे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# अन्नाची नासाडी : सामाजिक गुन्हा

अन्नाला आपल्या संस्कृतीत 'पूर्णब्रह्म' म्हटले जाते. अन्न हे केवळ जगण्यासाठीचे साधन नसून ते शेतकऱ्याच्या कष्टाचे, निसर्गाच्या देणगीचे आणि समाजाच्या सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक आहे. म्हणूनच अन्नाची नासाडी करणे म्हणजे केवळ एका पदार्थाची किंवा पैशाची नासाडी नव्हे, तर त्यामागे असलेल्या श्रमांचा आणि नैसर्गिक संसाधनांचा अपमान होय. त्यामुळे अन्नाचा अपव्यय रोखणे ही प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे.

२९ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय अन्नाची नासाडी आणि अपव्ययाबाबत जनजागृती दिन म्हणून पाळला जातो. अन्नाची नासाडी कमी करणे, अन्नसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि उपलब्ध अन्नाचा योग्य वापर करण्याची सवय समाजात रुजवणे, हा या दिनामागील प्रम



ुख उद्देश आहे. जगभरात एकीकडे कोट्यवधी लोकांना पुरेसे अन्न मिळत नाही, तर दुसरीकडे मोठ्या प्रमाणावर अन्न वाया जाते, ही विसंगती निश्चितच चिंताजनक आहे.

भारतातही अन्नाच्या अपव्ययाचे प्रमाण मोठे आहे. घरगुती वापर, हॉटेल-रेस्टॉरंट, विवाह समारंभ, विविध सामाजिक कार्यक्रम, बुफे पद्धतीचे भोजन आणि किरकोळ विक्रीच्या साखळीत मोठ्या प्रमाणावर अन्न वाया जाते. संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमाने (UNEP) प्रसिद्ध केलेल्या अहवालांनीही भारतातील अन्नाच्या अपव्ययाकडे लक्ष वेधले आहे. त्यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न केवळ अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यापुरता मर्यादित न ठेवता, उपलब्ध अन्न वाया जाऊ न देण्याशीही जोडला पाहिजे.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेतकरी उन्हातान्हात राबतो, पाऊस, दुष्काळ, अवकाळी पाऊस, रोगराई आणि बाजारभावाच्या संकटांचा सामना करतो. शेतातून आपल्या ताटापर्यंत अन्न पोहोचण्यासाठी अनेक हातांचे कष्ट लागतात. अशा परिस्थितीत ताटात वाढलेले अन्न अर्धवट सोडून देणे किंवा उरलेले अन्न निष्काळजीपणे कचरापेटीत फेकून देणे योग्य नाही. एका बाजूला शेतकरी अन्न पिकविण्यासाठी संघर्ष करतो आणि दुसऱ्या बाजूला आपण सहजपणे अन्न फेकून देतो, ही विरोधाभासी परिस्थिती बदलली पाहिजे.

आपल्या घरातील ज्येष्ठ मंडळी नेहमी सांगायची 'ताटात घेतलेले अन्न वाया घालवू नका.' 'हवे तेवढेच वाढून घ्या आणि घेतलेले पूर्ण खा' ही साधी शिकवण आजच्या पिढीने पुन्हा आत्मसात करण्याची गरज आहे. लग्नसम ारंभ, वाढदिवस, सण-समारंभ आणि हॉटेलम धील भोजनावेळी गरजेपेक्षा अधिक पदार्थ ताटात घेण्याची सवय कमी झाली पाहिजे. 'अधिक म्हणजे चांगले' या मानसिकतेऐवजी 'आवश्यक तेवढेच' हा विचार रुजविला पाहिजे.

अन्नाची नासाडी ही केवळ आर्थिक बाब नाही; तिचा पर्यावरणावरही परिणाम होतो. अन्न तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाणी, जमीन, ऊर्जा, वाहतूक आणि मनुष्यबळ लागते. अन्न तयार करून ते खाल्लेच गेले नाही तर या सर्व संसाधनांचा अप्रत्यक्ष अपव्यय होतो. फेकून दिलेले अन्न कचऱ्यात सडताना पर्यावरणासाठी हानिकारक वायू निर्माण होऊ शकतात. त्यामुळे अन्न वाचविणे म्हणजे केवळ अन्न वाचविणे नव्हे, तर पाणी, ऊर्जा, जमीन आणि पर्यावरणाचेही संरक्षण करणे होय.

अन्न वाया जाऊ नये यासाठी घरापासूनच सुरुवात करणे आवश्यक आहे. कुटुंबातील प्रत्येक सदस्याने गरजेपुरतेच अन्न वाढून घेणे, उरलेले अन्न योग्य पद्धतीने साठवणे, उपलब्ध अन्नाचा पुनर्वापर करणे आणि खराब होण्यापूर्वी त्याचा उपयोग करणे, या सवयी अंगीकारल्या पाहिजेत. हॉटेल आणि रेस्टॉरंटनीही ग्राहकांना आवश्यक तेवढेच अन्न घेण्यास प्रोत्साहन द्यावे.

त्याचबरोबर कार्यक्रमांमध्ये उरलेले सुरक्षित आणि खाण्यायोग्य अन्न गरजूंपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, हॉटेल व्यावसायिक आणि नागरिक यांच्या समन्वयातून व्यवस्था उभी करता येऊ शकते. अनेक ठिकाणी उरलेले अन्न गरजूंपर्यंत पोहोचविण्याचे उपक्रम सुरू आहेत. अशा उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देण्याची गरज आहे.

'कम्युनिटी किचन' किंवा सामुदायिक अन्नवाटप केंद्रांसारख्या संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविता येतील. मात्र गरजू व्यक्तींना अन्न देताना त्याची सुरक्षितता, स्वच्छता, साठवणूक आणि वेळेत वितरण यांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. उरलेले कोणतेही अन्न सरसकट वाटण्याऐवजी केवळ सुरक्षित आणि खाण्यायोग्य अन्नच गरजूंपर्यंत पोहोचले पाहिजे.

शाळा-महाविद्यालयांमध्येही अन्नाची किंमत आणि अन्नाच्या नासाडीचे दुष्परिणाम याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली पाहिजे. 'ताटात अन्न शिल्लक ठेवणार नाही', 'गरजेपुरतेच वाढून घेईन', 'अन्नाचा आदर करीन' अशा छोट्या संकल्पांमधून मोठा सामाजिक बदल घडू शकतो.

अन्नाची नासाडी थांबविण्यासाठी केवळ कायदे किंवा सरकारी योजना पुरेशा नाहीत. त्यासाठी प्रत्येकाच्या मनात संवेदनशीलता निर्माण होणे आवश्यक आहे. अन्नाचा प्रत्येक कण शेतकऱ्याच्या कष्टाची आणि निसर्गाच्या देणगीची आठवण करून देतो. त्यामुळे अन्न फेकण्यापूर्वी एका क्षणासाठी त्या अन्नासाठी राबलेल्या शेतकऱ्याचा आणि ते अन्न मिळावे म्हणून संघर्ष करणाऱ्या भुकेल्या माणसाचा विचार केला पाहिजे.

अन्न वाचविणे म्हणजे भूक भागविणे; अन्नाची नासाडी थांबविणे म्हणजे समाजाची संवेदनशीलता जपणे. म्हणूनच अन्नाची नासाडी ही केवळ वैयक्तिक चुकीची सवय न मानता एक गंभीर सामाजिक प्रश्न म्हणून पाहण्याची वेळ आली आहे. 'अन्न हे पूर्णब्रह्म' ही आपली संस्कृतीतील शिकवण केवळ बोलण्यात न राहता ती आपल्या आचरणात उतरली, तर अन्नाच्या अपव्ययाला मोठ्या प्रमाणात आळा घालता येईल.

अन्नाची नासाडी थांबवूया, अन्नाचा आदर करूया आणि अन्न वाचवून भुकेल्यांच्या जीवनात आशेचा घास देऊया!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

## शिक्षा

जाहीरकेला दुष्काळ
सरकारी शिक्षा पडे
समस्या तरी निरूत्तर
काय करायचे हो पुढे

आदेशआला लिखित
मदतीस तिजोरीउघडे
पिपासित अस्वस्थ ते
भरायलेलागतीलं घडे

धरण साठा तळ गाठे
नद्या सरोवरेही कोरडे
कशी भागवशी तहान
पांढरे ढग कसे ओरडे

काळाबाजार सरसावे
धान्य गोदामातचं सडे
बोर्डलावे स्टाकसंपला
रेशन दुकानदार तुसडे

जेंव्हा सांगती नेते बडे
धरणाची कवाडे उघडे
उपाशीराहील न कुणी
आश्वासना पाडे उघडे

वॉटर पार्क स्वीम पूल
बंद होणार का रे थोडे
गाड्याबड्या धुवायले
पाणी वापर करी गोडे

दुष्काळघ्या गांभीर्याने
आखावे नीटआराखडे
आता विरोधमावळावा
नको कुस्तीचे आखाडो

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशीही चौपाटीवर गणेशोत्सव मंडळांची गर्दी !

पृथ्वीतलावरील १० दिवसांचा मुक्काम संपवून अनंत चतुर्दशीला बाप्पा स्वगृही परतले. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी अनंत चतुर्दशीला गिरगाव चौपाटीवर गणेशभक्तांचा जनसागर लोटला होता.

हजारो मोठमोठ्या गणेशमूर्ती चौपाटीवर विसर्जनासाठी आल्या होत्या. प्रथेप्रमाणे गणेशभक्तांचा लाडका लालबागचा राजा दुसऱ्या दिवशी सकाळी चौपाटीवर आला. काही वर्षांपूर्वी लालबागचा राजा आणि बोटावर मोजता येतील असे काही ठराविक गणपती दुसऱ्या दिवशी पहाटे चौपाटीवर विसर्जनासाठी येत असत. त्यामुळे अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी केवळ लालबागचा राजाचे विसर्जन पाहायला मुंबई ठाण्यातून हजारो गणेशभक्त पहाटे उठून गिरगाव चौपाटीवर जात असत. लालबागचा राजा चौपाटीवर आला कि सुरक्षा यंत्रणा आणि वाहतूक यंत्रणेवरील ताणसुद्धा हलका होत असे. राजाचे विसर्जन झाले कि समुद्र किनाऱ्याच्या स्वच्छतेला सुरुवात केली जाते.

विसर्जनासाठी पालटलेले मार्ग पूर्ववत करण्यात येत असत, विसर्जन मार्गाच्या स्वछतेलाही सुरुवात केली जात असे. मागील ४-५ वर्षांपासून मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी चौपाटीवर येणाऱ्या गणेश मंडळांची संख्या कमालीची वाढली आहे. यावर्षी लालबागच्या राजाचे विसर्जन झाल्यानंतरही अनेक गणपती चौपाटीवर येतच होते. अनंत चतुर्दशीला गणेश म ूर्तींचे विसर्जन करण्याचा प्रघात असताना दुसऱ्या दिवशी सूर्योदयानंतर विसर्जन करणे शास्त्रविरोधी तर आहेच शिवाय महानगरपालिका, पोलीस प्रशासन आणि सामान्य नागरिकांसाठीही ते त्रासदायक आहे याची जाण ही गणेशोत्सव मंडळे केव्हा ठेवणार ? सकाळी विसर्जनासाठी येणाऱ्या मंडळांनी गणेशमूर्तींचे विसर्जन दुसऱ्या दिवशी सकाळी करण्याबाबत पालिका आणि पोलीस प्रशासनाची पूर्वपरवानगी घेतलेली असते का याची खात्री करून अशा मंडळांना सक्त ताकीद देणे गरजेचे आहे.

**सौ.मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### आडगाव बाजार शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी बाळासाहेब दाभाडे, उपाध्यक्षपदी रंगनाथ ठोके



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२८, आडगाव बाजार :** जिंतूर तालुक्यातील आडगाव बाजार येथील केंद्रीय प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी बाळासाहेब दाभाडे, तर उपाध्यक्षपदी रंगनाथ ठोके यांची पालकांच्या सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.यावेळी बहुसंख्य पालक उपस्थित होते. निवडीनंतर शाळेचे मुख्याध्यापक रोप शहा यांच्या हस्ते नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच समितीच्या सदस्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.या बैठकीस मुख्याध्यापक रोप शहा, नामदेव आमले, पालक सदस्य संतोष दाभाडे, खलील पठाण, सुधाकर ठोके, सुरेश दळवी, हनुमान चिलगर, महिला पालक लक्ष्मीबाई गडदे, नंदाबाई गवळी, पूजा ठोके यांच्यासह बहुसंख्य पालक उपस्थित होते.नवनिर्वाचित समितीच्या माध्यमातून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेसह विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

## सरकारच्या दुष्काळ 'जीआर' ची मुखेड तहसील कार्यालयासमोर होळी



**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२८, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यात कोरड्या दुष्काळाने शेतातली उभी पिके होरपळुन गेली आहेत. तरी, सरकारकडुन सन २०२६ च्या खरिप हंगामातील Trigger १ दुष्काळ लागु झालेल्या तालुक्यामधुन, मुखेड सारख्या डोंगराळ तालुक्याला वगळण्यात आले आहे. Trigger १ मधुन दुष्काळ जाहीर होवुन लागु करण्यात आलेल्या उपाययोजना व सवलतीपासुन मुखेड तालुका वंचित राहणार आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये या विरुध्द प्रचंड संताप आणि चिड आहे.

त्यामुळे तात्काळ मुखेड तालुक्याचा Trigger १ यादीमध्ये समावेश करुन दुष्काळ जाहीर झाला नाही तर, शेतकरी हजारोंच्या संख्येने रस्त्यावर उतरणार आहेत, असा निवेदनातून इशारा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दुष्काळ निवारण उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना तहसीलदार अभयराज नंजुडे यांच्या मार्फत मा.जि.प.अध्यक्ष दिलीप दिलीप पाटील बेटमोगरेकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत देण्यात आला आहे.

मुखेड तालुक्यामध्ये खरिप हंगामात जेवढा पाऊस पडला तेवढाच पाऊस किनवट, अर्धापुर, लोहा तालुक्यात पडला. तरी किनवट, अर्धापुर, लोहा तालुक्याचा Trigger १ दुष्काळ यादीमध्ये समावेश करण्यात आला, मात्र केवळ मुखेड तालुक्याला वगळण्यात आले आहे. अगोदरच निसर्गाच्या प्रकोपाने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांवर, सरकार आणी प्रशासनाच्या पक्षपाती धोरणामुळे शेतकरी सैरभैर व निराधार झाला आहे. याबद्दल शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप आणी रोष आहे.

तात्काळ सरकारने दुष्काळ जाहीर केलेल्या Trigger १ यादीमध्ये मुखेड तालुक्यांचा समावेश करावा, आणी Trigger १ ला लागु असलेल्या सर्व उपाययोजना व सवलती द्याव्यात. पिकविमा लागु करावा, हेक्टरी १ लाख रुपये अनुदान द्यावे. अन्यथा दि. १ आक्टोबर २०२६ गुरुवार रोजी सकाळी ठिक १० वाजता मुखेड तहसिल कार्यालयासमोर भव्य आणि तीव्र रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. याचा विचार करुन तात्काळ मुखेड तालुक्याचा Trigger १ दुष्काळ यादीमध्ये समावेश करावा अशी मागणी केली आहे.

यावेळी राजीव पाटील रावणगावकर,माधवराव पाटील उंद्रीकर, हणमंत नारनाळीकर, चंद्रकांत घाटे, संजय रावणगावकर, विकास पाटील ताटे, सुभाष पाटील पाळेकर, शंकर पाटील जांभळीकर, शौकत पठाण, शिवाजी पाटील बेळीकर, बालाजी सुडके, मगदूम पठाण कुरेशी, जगदीश कांबळे, हरिदास उगवणे, संदीप, पाटील उंद्रिकर, बालाजी बंडे, पाटील गोपीनाथ श्रीमंगले सुभाष, वलियोद्दीन शेख, माधव पाटील, बाळासाहेब नागरगोजे, किशोर जोशी, इरफान मोमीन, माणिक पाटील भगनुरकर, माधव जमजाळ, संभाजीघंटेवाड, मधुकर जुने, नागनाथ पाटील बेळीकर, रामकिशन पाटील, संजय नकुलवार, संभाजी पाटील जुने, बालाजी राठोड संभाजी पाटील लवटे, मगदुम पठाण सह तालुक्यातील शेतकरी सर्व पक्षीय पदाधिकारी पत्रकार बांधव उपस्थित होते.

## आडे येथील खोपटकर परिवाराच्या नवसाच्या गणपतीचे अनोखे विसर्जन



**अक्षराज : कृष्णा श्रावणपाटील**

**दि.२८, आडे (दापोली) :** आडे गावातील सुरेश पोशा खोपटकर यांच्या घरातील नवसाच्या गणपतीचे आज, दिनांक २८ सप्टेंबर रोजी भक्तिमय वातावरणात विसर्जन करण्यात आले. अनंत चतुर्दशीच्या दिवशी आडे तसेच तालुक्यातील अनेक गावांमध्ये बहुतांश गणेशमूर्तींचे विसर्जन झाल्यानंतर, त्यानंतर काही दिवसांनी गणपती बाप्पाची निघालेली ही मिरवणूक आडे ग्रामस्थांसाठी विशेष आकर्षणाचा विषय ठरली.

गावातून गणपतीची मिरवणूक जात असताना अनेक ग्रामस्थ क्षणभर स्तब्ध झाले. ही मिरवणूक नेमकी कोणाची, असा प्रश्न उपस्थित होत असतानाच ही सुरेश पोशा खोपटकर यांच्या घरातील नवसाच्या गणपतीची मिरवणूक असल्याचे समोर आले.

या विसर्जन मिरवणुकीत खोपटकर परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कुटुंबातील कन्या तसेच देवण खोपटकर यांच्यासह वैभव खोपटकर, जनार्दन खोपटकर, धोंडू खोपटकर, मिथून खोपटकर, अविनाश खोपटकर आदी उपस्थित होते.

भक्तिमय वातावरणात पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढण्यात आली. गणरायाच्या जयघोषात आणि उत्साहात खोपटकर परिवाराने आपल्या नवसाच्या बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला.

अनंत चतुर्दशीनंतर आडे गावात अशा प्रकारे नवसाच्या गणपतीची मिरवणूक आणि विसर्जन प्रथमच पाहायला मिळाल्याने या सोहळ्याची ग्रामस्थांमध्ये विशेष चर्चा रंगली.

## नासिर ढाब्याजवळ कार पलटी; खापरखेड्यातील एकाचा मृत्यू, तिघे जखमी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२८, नागपूर :** सावनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सावनेर-भोपाळ मार्गावरील हेटी येथील नासिर ढाब्याजवळ रविवारी (दि.२७) दुपारी १२ वाजताच्या सुमारास कार पलटी होऊन अपघात झाला. या अपघातात खापरखेडा येथील विजय बिंदेश्वर सिंग (वय ४२) यांचा मृत्यू झाला, तर तिघे जखमी झाले.

प्राथमिक माहितीनुसार, खापरखेडा येथील चौघे दोन दुचाकींवरून हेटी येथे प्लॉट पाहण्यासाठी जात होते. नासिर ढाब्याजवळ महामार्गाच्या कडेला लघुशंकेसाठी ते थांबले असताना त्यातील विजय बिंदेश्वर सिंग यांना त्या मार्गाने जाणाऱ्या कारने धडक दिली. धडकेनंतर कारचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार महामार्गाच्या दुभाजकावर आदळून पलटी झाली.

अपघाताची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांनी महामार्ग सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत कोळी यांना माहिती दिली. त्यानंतर हितज्योती आधार फाउंडेशनचे पथक आणि महामार्ग पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्या मदतीने जखमींना तातडीने सावनेर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी विजय बिंदेश्वर सिंग यांना मृत घोषित केले.

अपघातग्रस्त कारचा क्रमांक एमपी-०४ टीए-८४०६ असून, ती कृष्णदेव भुजवा (वय २६, रा. भोपाळ) चालवत असल्याची माहिती आहे. या अपघातात विजय सुंदरलाल डहरवाल (वय ४८, रा. चनकापूर, खापरखेडा) तसेच कारमधील संध्या प्रदीप वेधी (वय ५९) आणि प्रदीप वेधी (वय ६८), दोघेही रा. भोपाळ, जखमी झाले आहेत. तिघांनाही उपचारासाठी सावनेर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मृत विजय बिंदेश्वर सिंग हे खापरखेडा वीज केंद्रात रवी एनर्जी कंपनीच्या माध्यमातून कंत्राटी कामगार म्हणून कार्यरत होते. ते कोळशाचे नमुने गोळा करण्याचे काम करीत होते. त्यांचे वास्तव्य मिलन चौक, चनकापूर, खापरखेडा येथे होते.

दरम्यान, अपघातग्रस्त कारचा विमा संपलेला असल्याची माहिती समोर आली आहे. या बाबीची अधिकृत पडताळणी होणे आवश्यक आहे.

अपघाताची नोंद सावनेर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, अपघाताचे नेमके कारण आणि अन्य बाबींचा पुढील तपास सावनेर पोलीस व महामार्ग पोलीस करीत आहेत.

## सिनेट सदस्य हर्षद गंधेवार यांचा सत्कार



**अक्षराज : अरुण कुतरमारे**

**दि.२८, पोंभुर्णा :** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथील सिनेट सदस्य म्हणून नामनिर्देशित झाल्याबद्दल हर्षद वि. गंधेवार मुख्य लिपिक चिंतामणी कॉलेज ऑफ सायन्स पोंभूर्णा यांचा चिंतामणी कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, पोंभुर्णा येथील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांतर्फे हार्दिक सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वेगिनवार, चिंतामणी कॉलेज ऑफ सायन्स, पोंभुर्णा होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. नक्षीने, चिंतामणी कॉलेज ऑफ कॉमर्स, पोंभुर्णा तसेच प्राचार्य डॉ. गोंड, चिंतामणी महाविद्यालय, पोंभुर्णा उपस्थित होते.

यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. उपस्थित मान्यवरांनी हर्षद गंधेवार यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल कटकमवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन अजय बोमकंटीवार यांनी केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात संपन्न झाला.

## खापरखेडा पत्रकार संघाचा शाळा-महाविद्यालयांत जनजागृती व समुपदेशनाचा स्तुत्य उपक्रम



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२८, नागपूर :** अल्पवयीन मुलांनी दुचाकी चालवणे केवळ कायद्याने गुन्हा नसून ते स्वतःच्या आणि इतरांच्या जिवासाठी अत्यंत धोकादायक ठरू शकते. दिवसेंदिवस वाढणाऱ्या रस्ते अपघातांना आळा घालण्याच्या दृष्टीने व विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांची जाणीव निर्माण करण्यासाठी नागपूर जिल्हा मराठी पत्रकार संघ संलग्न खापरखेडा पत्रकार संघाच्या वतीने परिसरातील शाळा व महाविद्यालयांमध्ये विशेष जनजागृती व समुपदेशन मोहीम राबविण्यात आली.

हा उपक्रम प्लाजमा पब्लिक स्कूल, शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तसेच शंकरराव चव्हाण इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून पोलीस उपनिरीक्षक विलास करंगामी व अजिंक्य कदम, सामाजिक कार्यकर्ते पृथ्वीराज बोरकर, ज्येष्ठ पत्रकार व मार्गदर्शक दिवाकर घेर, अमर जैन, राजेश देशभ्रतार उपस्थित होते.

तसेच खापरखेडा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनील जालंदर, सचिव अभय मिश्रा, उपाध्यक्ष कपिल वानखेडे, राजेश खंडारे, केशव पानतावणे, सहसचिव मयूर तिरपुडे, गिरधारी शर्मा, यांच्यासह मुख्याध्यापक गणेश चिखले, लैला मैथ्यू, रजनी वाहने आणि उपमुख्याध्यापक ठाकरे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

समुपदेशनादरम्यान पोलीस उपनिरीक्षक विलास करंगामी व अजिंक्य कदम यांनी विद्यार्थ्यांना मोटार वाहन कायद्यातील कडक तरतुदींची माहिती दिली. अल्पवयीन मुलांनी दुचाकी चालवल्यास पालकांवर थेट कायदेशीर कारवाई होऊन ३० हजार रुपयांपर्यंतचा आर्थिक दंड आणि कारावास होऊ शकतो असा इशारा त्यांनी दिला तसेच अशा प्रकरणात अल्पवयीन मुलांना वयाची २५ वर्षे पूर्ण होईपर्यंत वाहन परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) मिळण्यात गंभीर कायदेशीर अडचणी निर्माण होतात, याचीही जाणीव करून दिली.

दुचाकी चालवताना हेल्मेटचा नियमित वापर, वेगमर्यादेचे काटेकोर पालन आणि 'ट्रिपल सीट' प्रवास न करणे यांसारख्या मूलभूत नियमांचे महत्त्व यावेळी विशद करण्यात आले. मुलांच्या हट्टापायी पालकांनी त्यांच्या हातात वाहने देऊ नयेत असे आवाहन खापरखेडा पोलिसांनी पालकांना केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी वाहतूक नियमांचे तंतोतंत पालन करण्याची आणि वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत दुचाकी न चालवण्याची सामूहिक शपथ देण्यात आली.

या सामाजिक उपक्रमात शाळा-महाविद्यालयांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पत्रकार संघाचे पदाधिकारी व शेकडो विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. खापरखेडा पत्रकार संघाच्या या संवेदनशील उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## पत्रकार सतेंद्र मातेरा यांचे वडील अनंता मातेरा काळाच्या पडद्याआड



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२८, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील उर्से ग्राम पंचायत हद्दीतील म्हसाड गावातील ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते तथा माजी ग्रामपंचायत सदस्य अनंता पांडु मातेरा यांचे शनिवार, दि.२६ सप्टेंबर २०२६ रोजी वयाच्या ६९व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी परिसरात पसरताच म्हसाडसह उर्से परिसरावर शोककळा पसरली.

अनंता मातेरा यांनी आपल्या आयुष्यात सामाजिक तसेच सार्वजनिक क्षेत्रात सातत्याने सक्रिय भूमिका बजावली. गावातील सर्वसामान्य नागरिकांशी त्यांचे सलोख्याचे संबंध होते. कोणत्याही सामाजिक किंवा सार्वजनिक प्रश्नावर आपली भूमिका स्पष्टपणे मांडण्याबरोबरच गावातील नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याची त्यांची कार्यपद्धती होती.

म्हसाड गावाच्या सामाजिक जीवनात त्यांचा अनेक वर्षांचा सक्रिय सहभाग राहिला. गावातील सार्वजनिक उपक्रम, सामाजिक कार्यक्रम तसेच विविध प्रश्नांमध्ये ते पुढाकार घेत असत. गावातील एखाद्या कुटुंबावर संकट आले किंवा नागरिकांना वैयक्तिक अडचणींचा सामना करावा लागला, तर शक्य ते सहकार्य करण्याची त्यांची भूमिका राहिली. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये त्यांनी आपुलकीचे आणि विश्वासाचे नाते निर्माण केले होते.

## ३ वर्षांनंतर खिडकाळी येथील ठामपा शाळा क्र. ८९ ला मिळाले पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन

### मनसेच्या पाठपुराव्याला यश...



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२८, दिवा (ठाणे) :** खिडकाळी येथील ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक ८९ मध्ये गेल्या तीन वर्षांपासून विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची जोडणी देण्यात आली नव्हती. त्यामुळे चिमुकल्यांना गेल्या ३ वर्षांपासून बोअरवेलच्या पाण्यावरच तहान भागवावी लागत होती.

या गंभीर प्रश्नाबाबत १२ ऑगस्ट २०२६ रोजी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देऊनही कोणतीही कार्यवाही झाली नाही. अखेर आज मनसेने आक्रमक भूमिका घेतली.

मनसेचे जिल्हा संघटक तुषार पाटील,विधानसभा सचिव शरद पाटील,शहर अध्यक्ष प्रशांत गावडे यांच्या नेतृत्वाखाली ठाणे महापालिका मुख्यालय येथे कार्यकारी अभियंता भगवान शिंदे आणि शिक्षण अधिकारी ओमकार बजागे यांची भेट घेऊन या विषयाचे गांभीर्य निदर्शनास आणून देण्यात आले.

मनसेच्या या आक्रमक पवित्र्यानंतर कार्यकारी अभियंता भगवान शिंदे यांनी तात्काळ आजच शाळेला पाणी पुरवठा करण्यासाठी नळ जोडणी करून देण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार तीन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर ठाणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने टॅप मारून नळ जोडणी करून दिली. अंधार पडल्याने शाळेपर्यंत पाईप टाकण्याचे काम उद्या सकाळी पूर्ण करण्यात येणार आहे. यावेळी मनसेचे विभाग अध्यक्ष जयेश घरत, विभाग अध्यक्ष शैलेंद्र कदम तसेच शाखाध्यक्ष सचिन चव्हाण उपस्थित होते.

# दुष्काळसदृश परिस्थितीची आ.दाते यांनी केली पाहणी

## शेतकऱ्यांना मदतीसाठी शासनाकडे पाठपुराव्याचे आश्वासन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघात यंदा कमी पावसामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांच्या पिकांवर संकट ओढावले आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार काशिनाथ दाते यांनी आज शासकीय अधिकाऱ्यांसह तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी केली. पारनेर तालुक्यातील वडनेर हवेली व पारनेर शिवारातील भागात भेट देऊन शेतीच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी त्यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी, पिकांची सद्यस्थिती आणि झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष माहिती जाणून घेतली. शेतकऱ्यांच्या कष्टाची व त्यांच्या अडचणींची शासनाला पूर्ण जाणीव असून, या संकटाच्या काळात शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील, असा विश्वास त्यांनी दिला.

शेतकऱ्यांच्या हितासाठी नुकसानग्रस्त पिकांचे वस्तुनिष्ठ पंचनामे, आवश्यक मदत व शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचे आमदार काशिनाथ दाते यांनी सांगितले.

आमदार काशिनाथ दाते यांच्या उपस्थितीत आज प्रतिनिधिक स्वरूपात आम्ही काही सोयाबीन पिकांची पाहणी केली. यावर्षी अलनिणोच्या प्रादुर्भावामुळे तालुक्यांत सुरवातीपासूनच पावसाची अनियमितता दिसून आली. त्यानंतर पावसात मोठा खंड पडला व आज शेतकऱ्यांचे मुग, सोयाबीन, बाजरी आदी खरिपाच्या पिकांचे संपुर्णत: नुकसान झालेले आहे. पारनेर तालुक्याच्या तहसीलदार,बिडीओ व पारनेर कृषी विभागचा प्रमुख म्हणून आम्ही सर्वांनी संपूर्ण तालुक्यातील तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यकांना खातेनिहाय पंचनामे करण्याचे आदेश दिलेले आहेत.

**- गजानन घुले, तालुका कृषी अधिकारी**

संपूर्ण मतदारसंघातील कुठल्याही शेतकऱ्यावर अन्याय होता कामा नये, एकही शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहणार नाही, याची प्रशासनाने काळजी घ्यावी. दुष्काळी परिस्थितीत आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष बांधावर पोहचणारी यंत्रणा, अचूक पंचनामे आणि पात्र शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचणे महत्त्वाचे आहे. या संपूर्ण प्रक्रियेत प्रशासन आणि शेतकरी यांच्यातील समन्वयाची भूमिका निर्णायक ठरणार असल्याने प्रशासन व नागरिकांनी एकमेकांबद्दल सहकार्याची भूमिका ठेवावी.

**- आमदार काशिनाथ दाते**

# कर्मवीर व रयत माऊली लक्ष्मीवहिनी यांचा वारसा जपा - खा.लंके

## टाकळी ढोकेश्वर येथे कर्मवीर भाऊराव पाटील जयंती साजरी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, पारनेर (अहिल्यानगर) :** आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी रयत शिक्षण संस्थेची स्थापना ४ ऑक्टोबर १९१९ मध्ये केली. अवघे ४ विद्यार्थी आणि ३० रुपये बजेट असणारी ही संस्था आज महाराष्ट्रातील १५ व कर्नाटक राज्यातील १ जिल्ह्यात विस्तारली असून रयतच्या ७७६ इतक्या शाखा कार्यरत आहेत. उपेक्षित वंचित समाजाच्या जीवनातील अज्ञान दूर करण्यासाठी शिक्षणाची गंगा सामान्यांच्या दारी नेऊन रयत शिक्षण संस्थेने तळमळीने कार्य केले. नव्या जगात घडणाऱ्या शैक्षणिक हालचाली जाणून स्वतः आधुनिकच्या दिशेने ती जात आहे. तरीही मातीशी नाळ कायम आहे. कर्मवीर अण्णा व रयत माऊली लक्ष्मीवहिनी यांचा त्यागाचा वारसा शिक्षकांसह आपण सर्वांनी पुढे अखंडपणे जपत चालवावा असे आवाहन खासदार निलेश लंके यांनी केले.

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त टाकळी ढोकेश्वर (ता. पारनेर) येथील रयत शिक्षण संस्थेच्या प्र. ग. खिलारी पा. माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी खासदार निलेश लंके म्हणाले, रयत हा जगातील आदर्श परिवार आहे. या संस्थेचे वेगळेपण टिकवण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन या ज्ञान मंदिराच्या भौतिक सुविधा वाढल्या पाहिजेत. यावेळी त्यांनी विद्यालयाच्या वसतिगृहासाठी स्वतंत्र इमारत उभारण्याची ग्वाही दिली. तसेच निवासी मुलींसाठी सुसज्ज बेड व्यवस्था उभारण्यास सहकार्य करणार असून विद्यालयाच्या रस्त्याचे काम लवकरच सुरू होणार असल्याचे सांगितले. बहुजन मुलींसाठी निवासी स्वरूपात सुरू असलेल्या या शाखेचे त्यांनी कौतुक केले.

यावेळी निलेश लंके प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष रविंद्र राजदेव यांनी विद्यालयाची प्रवेशद्वार कमान करून देण्याचे जाहीर केले. ज्ञानदेवराव पांडुळे यांनी शाखेच्या सुरुवातीचा इतिहास सांगितला, तर पंडितराव झावरे यांनी सुधारणात्मक कामांची माहिती दिली. सुनिलराव खिलारी यांनी बेड व्यवस्थेचे काम सुरू असल्याचे सांगितले. विक्रम झावरे यांनी पाणीपुरवठा व इतर मदतीबाबत भूमिका मांडून माजी विद्यार्थी संघामार्फत सहकार्याचे आश्वासन दिले. यावेळी जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेवराव पांडुळे, बाळासाहेब खिलारी, राष्ट्रवादीचे प्रवक्ते रोकडे, माजी नगराध्यक्ष अर्जुन भालेकर, सरपंच अशोक वाळुंज, सरपंच अरुणाताई खिलारी, उपसरपंच रामभाऊ तराळ, पंडितराव झावरे, मळीभाऊ रांधवन, सीताराम ढूस, श्रावण गायकवाड, गायके सर, संदीप व्यवहारे, विक्रम झावरे, महादू भालेकर यांसह ग्रामस्थ, पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कन्हान नदी पत्रातून अवैध वाळू उत्खनन

## १० चाकी ट्रकसह १० लाख ६८ हजारांचा मुद्देमाल जप्त



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२८, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या कन्हान नदीच्या पात्रातून मोठ्या प्रमणावर अवैध वाळू उत्खनन सुरू आहे. २७ सप्टेंबर रविवारला सकाळच्या सुमारास अवैधरित्या वाळू वाहतुक करणाऱ्या एका ट्रक चालकावर खापरखेडा पोलीस ठाण्यातील डीबी पथकाने कार्यवाही केली असून ४ ब्रास वाळू, ट्रकसह १० लाख ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी ट्रक चालक मालका विरुद्ध खापरखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.खापरखेडा पोलीस ठाण्याचे डी.बी.पथक दिनांक २७ सप्टेंबर रोजी पेट्रोलिंग करीत असताना कन्हान नदीपात्रातून अवैधरित्या उत्खनन केलेली वाळू घेऊन एक पिवळ्या रंगाचा १० चाकी ट्रक सुरादेवी मार्गाने जात असल्याची माहिती मिळाली. सुरादेवी रोड, वारेगाव परिसरात १० चाकी ट्रक क्र. एमएच-४० बीजी-०८०१ पोलिसांनी अडवून तपासणी केली असता ट्रकमध्ये ४ ब्रास अवैध वाळू आढळून आली.वाळू वाहतुकीबाबत ट्रक चालकाला विचारणा केली तेव्हा चालकाकडे रॉयल्टी नव्हती.

यासंदर्भात डीबी पथकाने ट्रक चालक जायद मोहम्मद शेख(२२) बिना (संगम) याला ताब्यात घेतले. चौकशी दरम्यान ट्रक मालक रमजान शेख वल्द शमशेर शेख(२६)बिना (संगम) याच्या सांगण्यावरून कन्हान नदीपात्रातून अवैध उत्खनन करून वाळू आणल्याची कबुली चालकाने दिली. पोलिसांनी ४ ब्रास रेती असा एकूण १० लाख ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी तक्रारदार पोलीस अंमलदार शेखर समाधान वानखेडे यांच्या तक्रारीवरून चालक जायद मोहम्मद शेख आणि मालक रमजान शेख यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ सह जमीन महसूल अधिनियम, खाण व खनिज अधिनियम आणि संपत्ती नुकसान प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला मात्र ट्रक मालक फरार असून त्याचा शोध सुरू आहे. सदर कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा संदीप सगणे, पोशि बादल गिरी, पोशि आशिष मेश्राम शेखर वानखेडे यांच्या पथकाने केली.

**वाळू माफियावर सरकारजमा कार्यवाही करा!**

खापरखेडा पोलीस ठाणे हद्दीत वलनी, सिल्लेवाडा, बिना(संगम), वारेगाव, सावली आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणात कन्हान व कोलार नदी पत्रात अवैध वाळू उत्खनन सुरु आहे. खापरखेडा पोलीस ठाणे ग्रामीण मध्ये असताना सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक महेश चाटे यांनी वाळू चोरी करणाऱ्या ट्रक मालकावर सरकारजमा कार्यवाही केली होती. त्यामूळे वाळू चोरीवर आळा बसला होता. अवैध वाळू माफियांनी परत आपले डोके वर काढले आहे. त्यामूळे खऱ्या अर्थाने सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक महेश चाटे पॅटर्न राबवण्याची गरज निर्माण झाली आहे.

# बेकरे येथे २३९ वे मोफत वैद्यकीय तपासणी शिबिर संपन्न

**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.२८, कर्जत (रायगड) :** कर्जत तालुक्यातील बेकरे गावातील रायगड जिल्हा परिषद शाळेत अ. पोलिस मित्र सुरक्षा परिषद संघटनेच्या माध्यमातून २३९ व्या मोफत वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. जीवक आयुर्वेदिक रुग्णालयाच्या सहकार्याने तसेच समाजभूषण जैतूबुवा कराळे यांच्यावतीने आयोजित या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व पूजनाने शिबिराची सुरुवात झाली. यावेळी संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्र रत्न डॉ. ज्ञानेश्वर साळोखे, डॉ. सुनील काळे आणि समाजभूषण जैतूबुवा कराळे यांची प्रमुख उपस्थिती होती.या शिबिरात बीपी, शुगर, कोलेस्ट्रॉल, वजन, डोळे तपासणी, गुडघेदुखी व विविध सामान्य आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. तसेच नागरिकांसाठी आयुष्मान कार्ड, आयुर्वेदिक उपचार व उपाययोजना, पंचकर्म थेरपी आणि झिरो बॅलन्स अकाउंट उघडण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. महिला व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत आपल्या आरोग्यविषयक समस्या तज्ज्ञांसमोर मांडल्या.दुपारी २.२० वाजता शिबिराची सांगता झाली. यावेळी डॉ. सुनील काळे (चू), डॉ. प्रियंका दोगरे (चू), डॉ. विशाल बनसोडे, रायगड जिल्हा युवक अध्यक्ष प्रफुल्ल जाधव, पत्रकार जयेश जाधव, कर्जत तालुका सदस्य संतोष सकपाळ, जीवक आयुर्वेदिक रुग्णालयाच्या ईशा रोकडे, नर्सिंग कर्मचारी सुनीता जाधव, सरिता दळवी, विनोद मालवणकर, सुरेश ठाणगे, भगवान कराळे यांच्यासह अंगणवाडी व आशा सेविका तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# थोडक्यात बातम्या

## आदर्श आचारसंहितेचे गांभीर्याने पालन करा - जिल्हाधिकारी पंत

### महाराष्ट्र विधान परिषद नागपूर पदवीधर मतदारसंघ निवडणूक




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या नागपूर पदवीधर मतदारसंघांच्या द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. त्यानुसार नागपूर पदवीधर मतदारसंघासाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार असून नागपूर विभागातील जिल्ह्यांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. सर्व संबंधित विभागांनी आदर्श आचारसंहितेचे गांभिर्याने पालन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दिले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय येथे नोडल अधिकाऱ्यांचा आढावा घेतांना त्या बोलत होत्या. पुढे जिल्हाधिकारी म्हणाल्या, निवडणुकांमध्ये सर्व संबंधित विभागांना देण्यात आलेली जबाबदारी अतिशय काळजीपूर्वक आणि गांभिर्याने पार पाडणे अपेक्षित असते. यात कोणतीही चूक होता कामा नये. आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता सर्वांनी घ्यावी. आचारसंहितेमधून दुष्काळी उपाययोजना, नुकसानीचे पंचनामे यांना सूट देण्यात आली आहे. त्यामुळे पंचनामे थांबवू नये. जिल्ह्याच्या सीमेवर एसएसटी/एफएसटी आदी पथकांची नियुक्ती करावी. आतापासूनच मतदान केंद्राची तपासणी करून किरकोळ दुरुस्ती असल्यास करून घ्यावी, अशा सुचना त्यांनी दिल्या. बैठकीला मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, अपर पोलिस अधिक्षक ईश्वर कातकडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी संजीव देशमुख, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, उपजिल्हाधिकारी संजय पवार, शुभम दांडेकर, नगर पालिका प्रशासन अधिकारी डॉ. विद्या गायकवाड यांच्यासह दूरदृष्यप्रणालीद्वारे सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार उपस्थित होते.

असा आहे निवडणूक कार्यक्रम २९ सप्टेंबर २०२६ रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर असून, ७ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्जांची छानणी करण्यात येईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ ऑक्टोबर आहे. २३ ऑक्टोबर रोजी मतदान झाल्यानंतर २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी करण्यात येणार आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२६ पूर्वी पूर्ण करण्यात येणार आहे.

## जागतिक रेबीज दिनानिमित्त पनवेलमध्ये शाळांमध्ये जनजागृती



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२८, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या वतीने जागतिक रेबीज दिनानिमित्त शहरातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. रेबीजची कारणे, संसर्ग टाळण्याचे मार्ग आणि प्राण्यांनी चावा घेतल्यास घ्यावयाची खबरदारी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी आणि पशुसंवर्धन अधिकारी डॉ.भगवान गीते यांच्या सूचनेनुसार पालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत हे उपक्रम घेण्यात आले.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र नवीन पनवेलअंतर्गत सेक्टर १३ येथील के.ए. बांठिया हायस्कूलमध्ये कार्यक्रम घेण्यात आला. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. मधुलिका लाड यांनी विद्यार्थ्यांना रेबीजबाबत माहिती दिली. पालेखुर्द येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत स्थानिक शाळेत जनजागृती करण्यात आली. तळोजा फेज-२ येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राने घोटगाव येथील वामन बाबा शाळेत विद्यार्थ्यांना वेळेवर लसीकरणाचे महत्त्व सांगितले. टेंभोडे व पडघे येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये रेबीज संसर्गाचे मार्ग आणि प्राण्यांनी चावा घेतल्यास घ्यावयाची खबरदारी याबाबत माहिती देण्यात आली. खारघर गावातील जिल्हा परिषद शाळा व एमएनआर शाळा, तसेच काळुंद्रे-भिंगारी येथील मार्केटयार्ड न्यू स्कूलमध्ये ही जनजागृती सत्र घेण्यात आले. प्राण्याने चावा घेतल्यास किंवा ओरखडा झाल्यास जखम साबण व स्वच्छ पाण्याने किमान १५ मिनिटे धुवावी आणि त्यानंतर तातडीने वैद्यकीय उपचार घ्यावेत. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार रेबीजविरोधी लस व आवश्यक इंजेक्शन घ्यावे. पाळीव प्राण्यांचे नियमित लसीकरण करावे आणि भटक्या प्राण्यांपासून सुरक्षित अंतर ठेवावे, असे आवाहन महानगरपालिकेने केले आहे.

## अनन्या देवईकर, कृतिका उपरकर यांची राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेकरीता निवड




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** क्रीडा व युवक कल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने व तालीम कुस्तीगीर संघ जिल्हा भंडारा यांच्या सहकार्याने आयोजित विभागीय शालेय कुस्ती स्पर्धा सन २०२६-२७ चे भंडारा येथे घेण्यात आलेल्या स्पर्धेत लोकमान्य टिळक कन्या विद्यालय चंद्रपूरच्या खेळाडू कु. अनन्या देवईकर व कु. कृतिका उपरकर यांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. नुकत्याच भंडारा येथे झालेल्या नागपूर विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेत १४ वर्ष वयोगटातील ४२ किलो वजन गटातील स्पर्धेत झालेल्या अतिम सामन्यात कु. अनन्या देवईकर हिने अतिशय चुरशीच्या सामन्यात फायनल (अंतिम) सामना जिंकून नागपूर विभागातून प्रथम आली आणि रायगड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच वयोगट १७ वर्षाआतील ४० किलो वजन गटातील फायनल (अंतिम) मध्ये कु. कृतिका उपरकर अतिशय रोमांचक खेळ करत विजयी झाली व नागपूर विभागातून प्रथम आली आणि सोलापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेकरीता निवड झाली. शालेय कुस्ती स्पर्धेत कु. अनन्या देवईकर व कु. कृतिका उपरकर यांची राज्यस्तरासाठी निवड झाल्यामुळे विजयी खेळाडूंना व मार्गदर्शक शिक्षक कळस्कर व नागपूरे मॅडम यांना लोकमान्य टिळक स्मारक मंडळाचे अध्यक्ष तथा लोकमान्य टिळक कन्या विद्यालय शाळा समितीचे अध्यक्ष ॲड. रवींद्रजी भागवत, सचिव गांगेय सराफ, तसेच मंडळाचे पदाधिकारी व सदस्य वृंद, आणि विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रांजली महादानी, पर्यवेक्षक दिपक गावंडे, शाळेतील शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन करुन राज्यस्तरावर उत्तम कामगिरी करण्याकरीता शुभेच्छा दिल्या.